।।ज्ञानदिप लावू जगी।।

## कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,**

## स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय

**म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे**

(नॅक प्रमाणित B ग्रेड (CGPA – 2.41))

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल

दि. २२ मार्च २०२२ ते २८ मार्च २०२२

## शैक्षणिक वर्ष: २०२१-२२

प्राचार्य

**NOT ME**



**BUT YOU**

**डॉ. शिवाजी पाटील**

| कार्यक्रम अधिकारी | महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी |
|---|---|---|
|  |  |  |
| डॉ. रमेश अहिरे | डॉ. वनिता पवार | डॉ. बाबासाहेब मोताळे |

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल (२०२१-२२)

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,

## स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय

म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | शिबिरातील कार्यक्रमांचा संक्षिप्त अहवाल | २-११ |
| ३. | वर्तमान पत्रातील बातम्यांची कात्रणे | १२-१३ |
| ४. | शिबिरात उपस्थित स्वयंसेवकांची यादी | १४-१५ |


**NOT ME BUT YOU**



माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेऊन समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फुल न फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करीत असतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधचीन्हाप्रमाणे आजचा स्वयंसेवक हा बोधचिन्हाच्या आठ आरेनुसार अष्टौप्रहर समाजसेवेसाठी बांधील आहे व लाल रंग हे तरुणांचे सळसळते रक्त हे राष्ट्र उभारणीचे प्रतिक असल्याचे दिसून येते. राष्ट्रीय सेवा योजना राबवित असलेल्या उपक्रमातून देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा, यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे.

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय म्हसदी, येथील राष्ट्रीय सेवा योजना एककाची १५० स्वयंसेवकाची तुकडी असून; यात प्रामुख्याने ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी सहभागी असतात. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. सी. अहिरे, महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, प्रा. डॉ. व्ही. टी. पवार आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बी. टी. मोताळे व इतर प्राध्यापक वृंद यांच्या मार्गदर्शनाखाली या माध्यमातून विविध समाजउपयोगी उपक्रम नियमित कार्यक्रमांतर्गत राबवित असते. प्रत्येक वर्षी दत्तक गावात सात दिवसीय निवासी विशेष शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांचा व्यक्तिमत्व विकास करतांना त्यांना ग्रामीण जीवनातील समस्यांची ओळख करून देत त्या सोडविण्यासाठी निस्वार्थ काम करण्यास युवकांना प्रेरित करते.

नियमित कार्यक्रमाच्या या अहवालास शुभेच्छा !!!!!

डॉ. शिवाजी पाटील

प्राचार्य

## १.प्रस्तावना

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात समाज सेवेची जाणीव निर्माण व्हावी, समाजाच्या सुख दु:खाशी त्यांनी समरस व्हावे. समाजाच्या तळागाळातील व्यक्तीपर्यंत त्यांची नाळ जोडली जावी, सामाजिक प्रश्नांच्या जाणीवेतून कर्तव्य भावना आणि श्रम प्रतिष्ठा निर्माण व्हावी, तसेच समाज सेवेच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि राष्ट्रसेवा घडावी, या उद्देशाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने २४ सप्टेंबर १९६९ रोजी भारताचे तत्कालीन शिक्षण मंत्री मा. व्ही. के. आर. व्ही. राव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात केली.

## महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाची

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत म्हसदी येथे आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्था, धुळे संचलित स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, ता. साक्री, जि. धुळे येथील म्हसदी गावी सन १९९८ मध्ये महाविद्यालयाची सुरुवात झाली. म्हसदी पंचक्रोशीतील ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थी विशेषतः मुलींसाठी उच्च शिक्षणाची सोय व्हावी. ग्रामीण व डोंगरी भागातील शेवटच्या घटकापर्यंत उच्च शिक्षणाची ज्ञान गंगोत्री पोहचावी. याउद्देशाने महाविद्यालय सुरु झाले. सन २००० साली महाविद्यालयाला ५० स्वयंसेवकांचे एकक सुरु करण्याची मान्यता तत्कालीन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने दिली. अशा रीतीने महाविद्यालयात सन २००० पासून राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महविद्यालय, म्हसदी येथे कार्यरत आहे. कालांतराने विद्यापीठाच्या मान्यतेनुसार एककातील स्वयंसेवकांची संख्या आता १५०आहे. आज रोजी १५० स्वयंसेवकांचे एकक महविद्यालयात कार्यरत आहे.

दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजनेत १५० स्वयंसेवक नोंदणीकृत केले जातात. या १५० पैकी ७५ स्वयंसेवकांची तुकडी सात दिवसीय निवासी शिबिरासाठी निवडले जातात.राष्ट्रीय सेवा योजना एककाला दर तीन वर्षाकरिता एक गाव दत्तक म्हणून घेतले. या दत्तक गावात पर्यावरण, आरोग्य, जलसंवर्धन व संधारण, शासन राबवीत असलेले योजना व उपक्रम याविषयी माहिती व जनजागृतीचे उपक्रम नियमित कार्यक्रम आणि शिबिरांतर्गत राबविले जातात. सन २०२०-२१ ते २०२२-२३ या तीन वर्षाच्या कालावधीकरीता धनदाई डोंगर, मु. पो. म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे हे गाव दत्तक गाव म्हणून मिळालेले आहे. या गावात राष्ट्रीय सेवा योजनेचे विविध जनजागृतीपर नियमित उपक्रम व सात दिवसीय नियमित शिबीर घेतले. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे सात दिवसीय निवासी शिबीर दि. २२ मार्च २०२२ ते २८ मार्च २०२२ या कालावधीत राबविण्यात आले. शिबिराचा संक्षिप्त वृतांत पुढील प्रमाणे सादर आहे.

## २. नियमित कार्यक्रमांचा संक्षिप्त अहवाल

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर दि. २२ मार्च २०२२ ते २८ मार्च २०२२ या सात दिवसाकरिता निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरासाठी खालील प्रमाणे नियोजित प्रकल्प ठरविण्यात आले होते.

### ≈ नियोजित प्रकल्प ≈

- माझे गांव कोरोनामुक्त गांव
- पर्यावरण व आरोग्य जनजागृती
- ग्राम स्वच्छता
- माझी वसुंधरा अभियान
- स्वच्छ भारत अभियान
- आपत्ती व्यवस्थापन, अंधश्रद्धा निर्मुलन
- जल संवर्धन, बेटी बचाव बेटी पढाव
- स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव वर्ष

NOT ME BUT YOU

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरासाठी खालील प्रमाणे दैनंदिनी ठरविण्यात आली होती.

## ≈ शिबीर दैनंदिनी ≈

| वेळ | कार्यक्रम | वेळ | कार्यक्रम |
|---|---|---|---|
| सकाळी<br>५.०० ते ६.१५ | व्यायाम व योगासन | दुपारी<br>३.०० ते ४.३० | व्याख्यान सत्र |
| सकाळी<br>६.३० ते ६.५५ | अल्पोपहार व चहा | संध्याकाळी<br>४.४५ ते ५.१५ | चहापान |
| सकाळी<br>७.०० ते १० | श्रमदान | संध्याकाळी<br>५.२० ते ७.०० | मैदानी खेळ व गटचर्चा |
| सकाळी<br>१० ते ११.१५ | स्वयंस्वच्छता | संध्याकाळी<br>७.१५ ते ८.०० | भोजन |
| सकाळी<br>११.३० ते दु. २ | भोजन व विश्रांती | रात्री<br>८.१५ ते ९.३० | सामाजिक विचारमंच व सांस्कृतिक कार्यक्रम |
| दुपारी<br>२.१५ ते ३.०० | गीतमंच | रात्री<br>९.४५ ते ९.५५ | प्रार्थना व दिपमालवण |

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिरासाठी दररोज दुपारी ३.०० ते ५.०० या काळात वैचारिक प्रबोधनाचे आयोजन करण्यात आले. त्याचा सविस्तर विवरण तक्ता खालीलप्रमाणे.

| दिनांक | प्रमुख वक्ते | उपक्रम/विषय |
|---|---|---|
| २२/०३/२०२२<br>मंगळवार | प्रा. डॉ. हेमंतकुमार पाटील,<br>(विभागीय समन्वयक, रासेयो, साक्री तालुका) | राष्ट्रीय सेवा योजना आणि युवक डिजिटल साक्षरता |
| २३/०३/२०२२<br>बुधवार | प्रा. विलास चव्हाण,<br>(माजी, संचालक, रासेयो, क.ब.चौ.उमवि.जळगाव)<br>डॉ. व्ही. एस. आढावे,<br>(माजी जिल्हा समन्वयक, धुळे जिल्हा रासेयो) | व्यक्तिमत्व विकास<br><br>राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक बांधिलकी |
| २४/०३/२०२२<br>गुरुवार | प्रा. उमेश गांगुर्डे<br>(कला महाविद्यालय, नवलनगर) | धरु या विज्ञानाची साथ, करु या अंधश्रद्धेवर मात. |
| २५/०३/२०२२<br>शुक्रवार | सौ. वर्षा देवरे<br>(मुख्याद्यापिका, गंगामाता कन्या विद्यालय, म्हसदी) | व्यक्तिमत्व विकास आणि शिक्षण बेटी बचाव, बेटी पढाव |
| २६/०३/२०२२<br>शनिवार | डॉ. वैभव सबनीस<br>(डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ कॉलेज, धुळे)<br>डॉ. अभिषेक रमेश देवरे<br>(वैद्यकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र, म्हसदी) | सोशल मीडिया आणि तरूणाई<br><br>माझे आरोग्य, माझी जबाबदारी |
| २७/०३/२०२२<br>रविवार | श्री. चेतन माळी<br>(पोलीस शिपाई, मोहाडी, धुळे) | स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन |
| २८/०३/२०२२<br>सोमवार | डॉ. शिवाजी पाटील<br>(भूगोल विभाग प्रमुख) | दु. १२ ते १:००<br>आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज |

## शिबिराचा पहिला दिवस (२२ मार्च २०२२)

दि. २२ मार्च २०२२ रोजी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. २२ मार्च जागतिक जल दिनानिमित्त सकाळी १०.०० वाजता जलपूजन करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. जलपूजन करून स्वयंसेवकांना जल संवर्धन, जल संधारण आणि जल नियोजनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. यादरम्यान जलसंवर्धनाची शपथ घेण्यात आली. शिबिराचे उद्घाटन माजी सैनिकांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी खालील प्रमुख अतिथी उपस्थित होते.

### ≈ उद्घाटक ≈

• मा. श्री. अनिल लोटन देवरे •
माजी सैनिक, म्हसदी

### ≈ कार्यक्रमाचे अध्यक्ष ≈

• मा. दादासाहेब श्री. संजयकुमार रामचंद्र देवरे •
अध्यक्ष, आ.ध.मा.शि.प्र. संस्था, धुळे

### ≈ प्रमुख पाहुणे ≈

• मा. दादासाहेब श्री. सुभाष गजमल देवरे •
अध्यक्ष, धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळ, म्हसदी

• मा. ताईसाहेब सौ. शैलेजा राजेंद्र देवरे •
सरपंच, ग्रामपंचायत, म्हसदी

• मा. आबासाहेब श्री. राजाराम माणिक देवरे •
उपाध्यक्ष, आ.ध.मा.शि.प्र. संस्था, धुळे

• मा. ताईसाहेब डॉ. सौ. संजिवनी संजयकुमार देवरे •
सचिव, आ.ध.मा.शि.प्र.संस्था, धुळे

• मा. ताईसाहेब डॉ. सुजाता सुनील सोनवणे •
खजिनदार, आ.ध.मा.शि.प्र. संस्था, धुळे

• मा. इंजि. बाबासाहेब श्री. कुणाल संजयकुमार देवरे •
संचालक, आ.ध.मा.शि.प्र. संस्था, धुळे

दुपारी २ ते ३ वाजे दरम्यान स्वयंसेवकांचे ग्रुप तयार करण्यात आलेत. प्रत्येक ग्रुपला आपापसात चर्चा करून ग्रुप लीडर निवडण्याची संधी देण्यात आली. प्रत्येक ग्रुपने आपला एक ग्रुप लीडर निवडला. सात दिवसासाठी सात ग्रुप तयार करण्यात आले. प्रत्येक ग्रुप मधील सदस्याने आपली ओळख दिली. स्वयंसेवकांना शिबिराची दैनंदिनी समजून देण्यात आली.

दुपारी ३ ते ५ या काळात वैचारिक प्रबोधनपर व्याख्यान घेण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना व युवक, डिजिटल साक्षरता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्यानकर्ते म्हणून रासेयो साक्री तालुक्याचे विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील हे उपस्थित होते.

संध्याकाळी ५ ते ७ मैदानी खेळ व गट चर्चा घेण्यात आली.

रात्री ८ ते १० वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.







## शिबिराचा दुसरा दिवस २३ मार्च २०२२

२३ मार्च २०२२ हा शिबिराचा दुसरा दिवस शिबिराच्या दैनंदिनी प्रमाणे

सकाळी ५ ते ६.१५ पर्यंत **योगासन, प्राणायाम व प्रार्थना** घेण्यात आली.

सकाळी ६.१५ ते ७.०० अल्पोपहार व चहा घेण्यात आला.

सकाळी ७ ते १० वाजेपर्यंत **श्रमदान** – धनदाई देवी मंदिर परिसर स्वच्छ करण्यात आला.

दुपारी २.१५ ते ३ वाजेपर्यंत गीतमंच व चर्चा करण्यात आली.

दुपारी ३ ते ५ **वैचारिक प्रबोधन**

**विषय:** व्यक्तिमत्व विकास व्याख्यानकर्ते माजी संचालक रासेयो. प्रा. विलास चव्हाण हे उपस्थित होते.

**विषय:** राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक बांधिलकी. व्याख्यानकर्ते म्हणून डॉ. वाल्मिक आढावे हे उपस्थित होते.

सायंकाळी ५ ते ७ **गटचर्चा** घेण्यात आली.

रात्री ८ ते १० **सांस्कृतिक कार्यक्रम, रंगमंच** इ. घेण्यात आले.











## २४ मार्च २०२२ शिबीराचा तिसरा दिवस

२४ मार्च २०२२ हा शिबिराचा तिसरा दिवस शिबिराच्या दैनंदिनी प्रमाणे

सकाळी ५ ते ६.१५ पर्यंत **योगासन, प्राणायाम व प्रार्थना** घेण्यात आली.

सकाळी ६.१५ ते ७.०० अल्पोपहार व चहा घेण्यात आला.

सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत २४ मार्च जागतिक क्षयरोग दिनानिमित्त **आरोग्य तपासणी शिबीर** म्हसदी गावातील प्राथमिक आरोग्य केंद्र व साक्री येथील क्षयरोग निवारण पथक यांच्या सहकार्याने स्वयंसेवकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सर्व स्वयंसेवकांचे रक्ताचे नमुने घेण्यात आले. क्षयरोग निवारण पथकाचे वरिष्ठ पर्यवेक्षक श्री. अजय पवार, प्राथमिक आरोग्य केंद्र, म्हसदी येथील औषध निर्माण अधिकारी श्री. दिलीप बोरसे यांनी स्वयंसेवकांना क्षयरोगाची लक्षणे, परिणाम व उपचार याविषयी माहिती दिली. शासन राबवीत असलेले क्षयरोग निवारण उपक्रम व योजना यांची माहिती दिली.

दुपारी २.१५ ते ३ वाजेपर्यंत गीतमंच व चर्चा करण्यात आली.

दुपारी ३ ते ५ **वैचारिक प्रबोधन**

**विषय:** धरू या विज्ञानाची साथ, करू या अंधश्रद्धेवर मात. प्रा. डॉ. उमेश गांगुर्डे, कला महाविद्यालय, नवलनगर हे उपस्थित होते.

**विषय:** राष्ट्रीय सेवा योजना आणि सामाजिक बांधिलकी, व्याख्यानकर्ते म्हणून डॉ. वाल्मिक आढावे हे उपस्थित होते.

सायंकाळी ५ ते ७ **गटचर्चा** घेण्यात आली.

रात्री ८ ते १० **सांस्कृतिक कार्यक्रम, रंगमंच** इ. घेण्यात आले.











## २५ मार्च २०२२ शिबिराचा चौथा दिवस

२५ मार्च २०२२ हा शिबिराचा चौथा दिवस शिबिराच्या दैनंदिनी प्रमाणे

सकाळी ५ ते ६.१५ पर्यंत **योगासन, प्राणायाम व प्रार्थना** घेण्यात आली.

सकाळी ६.१५ ते ७.०० अल्पोपहार व चहा घेण्यात आला.

सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत **कोरोना लसीकरण सर्वेक्षण** म्हसदी गावात कोरोन लसीकरण सर्वेक्षण करण्यात आले. ३०० कुटुंबांचे मुलाखती घेऊन प्रश्नावलीत माहिती गोळा करण्यात आली. यादरम्यान रासेयोचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील यांनी शिबीरस्थळाला भेट दिली. संचालकांच्या उस्थितीत माझी वसुंधरा अंतर्गत व वसुंधरा रक्षणाची शपथ घेण्यात आली.

दुपारी २.१५ ते ३ वाजेपर्यंत गीतमंच व चर्चा करण्यात आली.

दुपारी ३ ते ५ **वैचारिक प्रबोधन**

**विषय:** व्यक्तिमत्व विकास आणि शिक्षण, बेटी बचाव बेटी पढाव यावर सौ. वर्षा देवरे, मुख्याद्यापिका, गंगामाता कन्या विद्यालय, म्हसदी हे मार्गदर्शनासाठी उपस्थित होते.

सायंकाळी ५ ते ७ **गटचर्चा** घेण्यात आली.

रात्री ८ ते १० **सांस्कृतिक कार्यक्रम, रंगमंच** इ. घेण्यात आले.















## २६ मार्च २०२२ शिबिराचा पाचवा दिवस

२६ मार्च २०२२ हा शिबिराचा पाचवा दिवस शिबिराच्या दैनंदिनी प्रमाणे

सकाळी ५ ते ६.१५ पर्यंत **योगासन, प्राणायाम व प्रार्थना** घेण्यात आली.

सकाळी ६.१५ ते ७.०० अल्पोपहार व चहा घेण्यात आला.

सकाळी ७ ते १० वाजेपर्यंत **प्लास्टिक कचरा मुक्त अभियान** म्हसदी गावातुन प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला. ग्रामपंचायत म्हसदी यांच्या सहकार्याने ट्रॅक्टर देण्यात आले. त्यात प्लास्टिकचा कचरा संपूर्ण गावातून गोळा करण्यात आला. म्हसदी ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. शैलेजा देवरे, ग्रामविकास अधिकारी श्री. मेघश्याम बोरसे यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत समोर माझी वसुंधरा अंतर्गत प्लास्टिक कचरा मुक्तीची शपथ घेण्यात आली.

सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत **ध्वजारोहण प्रशिक्षण** क्रिडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांनी स्वयंसेवकांना राष्ट्र ध्वजाची आचार संहिता व माहिती दिली. व सर्वांना ध्वजारोहण कसे करतात याचे प्रशिक्षण दिले.

दुपारी ३ ते ५ **वैचारिक प्रबोधन**

**विषय:** सोशल मिडिया आणि युवक यावर डॉ. वैभव सबनीस हे मार्गदर्शनासाठी उपस्थित होते. माझे आरोग्य माझी जबाबदारी याविषयावर प्राथमिक आरोग्य केंद्र, म्हसदी येथील आरोग्य अधिकारी डॉ. अभिषेक देवरे यांनी मार्गदर्शन केले.

सायंकाळी ५ ते ७ **गटचर्चा** घेण्यात आली.

रात्री ८ ते १० **सांस्कृतिक कार्यक्रम, रंगमंच** इ. घेण्यात आले.










## २७ मार्च २०२२ शिबिराचा सहावा दिवस

२७ मार्च २०२२ हा शिबिराचा सहावा दिवस शिबिराच्या दैनंदिनी प्रमाणे

सकाळी ५ ते ६.१५ पर्यंत **योगासन, प्राणायाम व प्रार्थना** घेण्यात आली.

सकाळी ६.१५ ते ७.०० अल्पोपहार व चहा घेण्यात आला.

सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत **श्रमदान** धनदाई देवी मंदिर परिसरातील कचरासाफ करण्यात आला. वृक्षारोपणासाठी अधिवाशी वस्ती शाळेच्या परिसरात खड्डे खोदण्यात आलेत. शाळेचा सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला.

दुपारी ३ ते ५ **वैचारिक प्रबोधन**

**विषय:** स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन याविषयावर श्री. चेतन माळी यांनी मार्गदर्शन केले.

सायंकाळी ५ ते ७ **माझी वसुंधरा अंतर्गत वसुंधरा रक्षणाची शपथ** घेण्यात आली.

रात्री ८ ते १० **सांस्कृतिक कार्यक्रम, रंगमंच** इ. घेण्यात आले.















## २८ मार्च २०२२ शिबिराचा सातवा दिवस

२८ मार्च २०२२ हा शिबिराचा सातवा व समारोपाचा दिवस शिबिराच्या दैनंदिनी प्रमाणे

सकाळी ५ ते ६.१५ पर्यंत **योगासन, प्राणायाम व प्रार्थना** घेण्यात आली.

सकाळी ६.१५ ते ७.०० अल्पोपहार व चहा घेण्यात आला.

सकाळी ७ ते ११ वाजेपर्यंत **श्रमदान** धनदाई देवी मंदिर परिसरातील कचरा साफ करण्यात आला. सर्व परिसर स्वच्छ करण्यात आला.

दुपारी १२ ते १ **वैचारिक प्रबोधन**

**विषय:** आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज याविषयावर डॉ. शिवाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

दुपारी २ ते ३ **समारोप समारंभ, भारतीय संविधानाची उद्देशिकेचे सामुहिक वाचन व वितरण राष्ट्रगीताने शिबिराचा समारोप**

समारोपाला खालील मान्यवर उपस्थित होते.

≈ समारोपकर्ते ≈

● मा. प्रा. डॉ. सचिन नांद्रे ●
(संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, कबचौ उ.म.वि. जळगाव)

≈ कार्यक्रमाचे अध्यक्ष ≈

● मा. डॉ. शिवाजी पाटील ●
(प्राचार्य)

≈ प्रमुख पाहुणे ≈

● मा. श्री. प्रशांत गुलाबराव देवरे ●
(माजी सैनिक)

● मा. श्री. महेंद्र दौलतराव देवरे ●
(सचिव, धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळ, म्हसदी)

● मा. श्री. नंदलाल हिरामण निकम ●
(माजी सैनिक)

● डॉ. हेमंतकुमार दत्तात्रय पाटील ●
(रासेयो, विभागीय समन्वयक, साक्री तालुका)











## ३. शिबिरात उपस्थित स्वयंसेवकांची यादी

| अ.क्र. | स्वयंसेवकाचे नांव | वर्ग | लिंग | संवर्ग | NSS वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १. | शिंदे नयना भरत | SYBSc | F | OBC | द्वितीय |
| २. | देवरे वैभव दिपक | SYBA | M | OBC | प्रथम |
| ३. | देवरे रोहिणी भटू | SYBA | F | OBC | प्रथम |
| ४. | सोनवणे प्रदिप संजय | SYBA | M | OBC | प्रथम |
| ५. | देशपांडे सपना दयाराम | TYBSc | F | OBC | द्वितीय |
| ६. | देवरे ऋषीकेश किशोर | TYBSc | M | OBC | द्वितीय |
| ७. | खैरनार मनीष योगेश | SYBSc | M | OBC | द्वितीय |
| ८. | पवार नितीराज अरुण | SYBSc | M | OBC | द्वितीय |
| 9. | नेरे तुषार संजय | SYBSc | M | OBC | द्वितीय |
| १०. | साळवे जयश्री पुंडलिक | FYBA | F | SC | प्रथम |
| ११. | कारंडा नानाभाऊ शामराव | TYBSc | M | NT | द्वितीय |
| १२. | खैरनार विद्या अशोक | TYBSc | F | OBC | द्वितीय |
| १३. | नेरे किरण शरद | TYBSc | M | OBC | द्वितीय |
| १४. | खैरनार रोहिणी तुषार | FYBA | F | OBC | प्रथम |
| १५. | थोरात आनंदा भटू | FYBA | M | SC | प्रथम |
| १६. | आढावे मयूर वाल्मिक | SYBA | M | NT | द्वितीय |
| १७. | मोहिते ऋतुजा शशिकांत | TYBSc | F | SC | द्वितीय |
| १८. | शाह फारुख साबीर | TYBSc | M | VJNT | द्वितीय |
| १९. | बेडसे भावेश शिवाजी | SYBSc | M | OBC | प्रथम |
| २०. | पोतदार वर्षा भानुदास | TYBSc | F | OBC | द्वितीय |
| २१. | सोनवणे जयश्री यशवंत | SYBSc | F | OBC | द्वितीय |
| २२. | पिंजारी शोएब सत्तार | TYBSc | M | OPEN | द्वितीय |
| २३. | शिंदे भावेश प्रल्हाद | SYBSc | M | OBC | प्रथम |
| २४. | तोरवणे निशिगंधा नानासाहेब | SYBSc | F | OBC | द्वितीय |
| २५. | नेरे सुमित राजेंद्र | SYBSc | M | OBC | द्वितीय |
| २६. | निकम चेतन कारभारी | TYBSc | M | OBC | द्वितीय |
| २७. | मोहिते चेतना हिम्मत | TYBSc | F | SC | द्वितीय |
| २८. | साळुंखे प्रवीण शंकर | TYBSc | M | ST | द्वितीय |
| २९. | पारधी साधना राजेंद्र | FYBA | F | ST | प्रथम |
| ३०. | साळुंखे अक्षय विनायक | SYBSc | M | OBC | द्वितीय |

| अ.क्र. | स्वयंसेवकाचे नांव | वर्ग | लिंग | संवर्ग | NSS वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| ३१. | सोनवणे हर्षदा शरद | SYBSc | F | OBC | द्वितीय |
| ३२. | जाधव संजय भरत | TYBA | M | SC | द्वितीय |
| ३३. | माळी सारिका सुभाष | SYBA | F | OBC | द्वितीय |
| ३४. | गायकवाड रतिलाल विजय | FYBA | M | ST | प्रथम |
| ३५. | पठाण सारमीन आरीफखान | SYBSc | F | OPEN | द्वितीय |
| ३६. | शाह समीर सिराज | TYBSc | M | NT | द्वितीय |
| ३७. | जाधव गीतांजली गोरख | FYBA | F | OBC | प्रथम |
| ३८. | देसले निखील सुरेश | SYBSc | M | OBC | द्वितीय |
| ३9. | नेर रोहित कैलास | FYBA | M | OBC | प्रथम |
| ४०. | देवरे योगिता दौलतराव | TYBSc | F | OBC | द्वितीय |
| ४१. | भामरे वैभव सुरेंद्र | SYBSc | M | OBC | द्वितीय |
| ४२. | देवरे प्रीती मनोहर | SYBSc | F | OBC | द्वितीय |
| ४३. | अहिरराव हितेश चुडामण | TYBSc | M | OBC | द्वितीय |
| ४४. | माळी कल्पना रोहिदास | SYBA | F | OBC | द्वितीय |
| ४५. | चित्ते कपिल देवानंद | FYBA | M | OBC | प्रथम |
| ४६. | पाटील अधिकार झिपा | TYBA | M | OBC | द्वितीय |
| ४७. | अहिरे दिवेश सुनील | TYBSc | M | OBC | द्वितीय |
| ४८. | बेडसे प्रमिला दादाजी | SYBSc | F | OBC | द्वितीय |
| ४९. | भामरे तेजस प्रकाश | SYBSc | M | OBC | द्वितीय |
| ५०. | सोनवणे प्रिया अशोक | SYBA | F | SC | प्रथम |
| ५१. | भामरे दिपक शशिकांत | FYBA | M | OBC | प्रथम |
| ५२. | देसले आरती दिपक | FYBA | F | OBC | प्रथम |
| ५३. | निकवाडे अमन अशोक | SYBA | M | NT | प्रथम |
| ५४. | दाभाडे कुणाल देविदास | TYBA | M | ST | द्वितीय |
| ५५. | देवरे भूषण हिम्मत | TYBSc | M | OBC | द्वितीय |
| ५६. | खैरनार मोहन सुदामान | TYBSc | M | OBC | द्वितीय |
| ५७. | गायकवाड लक्ष्मण वसंत | SYBA | M | ST | द्वितीय |
| ५८. | दाभाडे सोनल श्रावण | FYBSc | F | ST | प्रथम |
| ५९. | देवरे सुजित माधवराव | TYBSc | M | OBC | द्वितीय |
| ६०. | ठाकरे रीना निंबा | SYBSc | F | OBC | प्रथम |

**पुण्यनगरी**



# मुक्या प्राण्यांना वाचवण्यासाठी प्लास्टिकवर बंदी महत्त्वाची : प्रा. डॉ.आर.सी.अहिरे

**म्हसदी** : जल, वायू आणि ध्वनी प्रदूषणाबरोबरच प्लॅस्टिक कचरा ही एक अतिशय जटिल समस्या निर्माण झाली आहे. मुके प्राणी प्लॅस्टिक कचऱ्याच्या सेवनाने मृत्यू पावत आहेत. मुक्या प्राण्यांना वाचवण्यासाठी प्लास्टिकवर बंदी महत्वाची असल्याचे प्रतिपादन येथील आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रमेश अहिरे यांनी केले.

येथील आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर कुलदैवत धनदाई मातेच्या मंदिरावर आयोजित करण्यात आले आहे. यावेळी सरपंच शैलेजा देवरे, ग्रामविकास अधिकारी मेघःशाम बोरसे यांच्या समवेत प्लॅस्टिक कचरा मुक्तीची शपथ घेण्यात आली. ग्रामपंचायतीकडून प्लॅस्टिक कचरा गोळा करण्यासाठी ट्रॅक्टरची व्यवस्था करून सहकार्य करण्यात आले. याप्रसंगी प्लॅस्टिक कचरा मुक्त अभियान मोहिमेचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले. डॉ. वनिता पवार व डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी सहकार्य केले.

**सकाळ TODAY**



म्हसदी : वसुंधरा रक्षणाची शपथ घेताना देवरे महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# स्वयंसेवकांकडून वसुंधरा रक्षणाची शपथ

**म्हसदी** : येथील (स्व.) अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर येथील धनदाईदेवी मंदिर परिसरात सुरू आहे. वसुंधरा रक्षण जनजागृतीसाठी महाराष्ट्र शासन माझी वसुंधरा अभियान राबवीत आहे. ग्रामीण भागातील जनतेत वसुंधरा रक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी येथील ग्रामपंचायतीच्या प्रांगणात सरपंच शैलजा देवरे व ग्रामविकास अधिकारी मेघश्याम बोरसे व ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या समक्ष सर्व शिबिरार्थी स्वयंसेवकांनी माझी वसुंधरा शपथ घेतली. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब मोताळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. वनिता पवार उपस्थित होते.

**पुण्यनगरी**

# रासेयो शिबिरात राष्ट्रध्वजाची दिली माहिती

**म्हसदी** : येथील आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात स्वयंसेवकांना राष्ट्रीय ध्वजाची संहिता व नियम याबाबत माहिती देण्यात आली. राष्ट्र ध्वजाची घडी कशी करावी, राष्ट्र ध्वज खांबावर कसा चढवावा, ध्वजारोहण कशा पद्धतीने केले जाते, त्याबाबतचे नियम व संहिता सांगून प्रात्यक्षिकातून प्रत्येकाला ध्वजारोहणाचे प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. जगदीश तोरवणे यांनी ध्वजारोहण प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. येथील धनदाई डोंगर परिसरात राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर सुरू होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे, डॉ. वनिता पवार व डॉ. बाबासाहेब मोताळे यांचे सहकार्य लाभले.





म्हसदी : धनदाईदेवी मंदिराजवळ शिबिराच्या समारोपप्रसंगी संविधानाच्या उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करताना मान्यवर.

# म्हसदीत शिबिराचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी, ता. ३१ : जगातील प्रत्येक देशाला संविधान असते. देशाचा आत्मा म्हणजे त्या देशाच्या संविधानाची उद्देशिका असल्याचे सांगत संविधान उद्देशिकेचे सामुदायिक वाचन करावे, असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रमेश अहिरे यांनी केले.

येथील आर. डी. देवरे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या संविधान उद्देशिकेचे वाचन व माजी सैनिकाच्या उपस्थितीत समारोप झाला. माजी सैनिक प्रशांत देवरे उपस्थित होते.

जनसहभागातून देशसेवा व जनजागृतीची कामे झाली पाहिजेत, अशी अपेक्षा उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी व्यक्त केली. धनदाईदेवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, उपाध्यक्ष के. एन. देवरे, ज्येष्ठ संचालक रघुनाथ देवरे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. शिवाजी पाटील, विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, डॉ. वाल्मीक आढावे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. पाटील यांच्या हस्ते संविधान उद्देशिका उपस्थितांना देण्यात आल्या. डॉ. रमेश अहिरे यांनी अहवाल सादर केला. दीपक भामरे यांनी सूत्रसंचालन केले. वर्षा देवरे हिने आभार मानले. डॉ. वनिता पवार व डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी सहकार्य केले.

**पुण्यनगरी**

# देवरे महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप



**म्हसदी** : प्रत्येक देशाला एक संविधान आहे. संविधान हा देशाचा आत्मा आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपल्या देशाचे संविधान, उद्देशिकेची माहिती असणे गरजेचे आहे असे प्रतिपादन येथील आर.डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रमेश अहिरे यांनी केले.

येथील धनदाई देवी मंदिर परिसरात आर.डी. देवरे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिवाजीराव पाटील अध्यक्षस्थानी होते.तर येथील माजी सैनिक प्रशांत गुलाबराव देवरे प्रमुख पाहुणे म्हणून तर उमवि रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. धनदाई देवी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष सुभाष देवरे, आर.आर. देवरे व संचालक मंडळाचे पदाधिकारी तसेच साक्री तालुका विभागीय समन्वयक डॉ. हेमंतकुमार पाटील, डॉ. वाल्मिक आढावे आदी उपस्थित होते. सूत्र संचलन दीपक भामरे यांनी केले. यावेळी आभार कु. वर्षा देवरे हिने मानले. समारोप प्रसंगी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या शिबिरासाठी डॉ. वनिता पवार, डॉ. बाबासाहेब मोताळे यांनी सहकार्य केले.